नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष - ४ थे<br>Year - 4rd | अंक - १४३<br>Issue - 143 | वार - रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६<br>Blow- Sunday Date 18 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |

# लहान मुलांसाठीही 'इंटरनेट' हा मूलभूत हक्क; वापरावर पूर्ण बंदी घालण्यास सुप्रिम कोर्टाचा नकार

## ग्रामीण भागातील व गरजू मुलांसाठी इंटरनेट हेच शिक्षणाचे मुख्य माध्यम; मुलांचे स्वातंत्र्य आणि सुरक्षा दोन्ही तितकेच महत्त्वाचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लहान मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने (सुप्रीम कोर्ट) एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे. घटनेच्या 'कलम २१' (जीवनाचा अधिकार) आणि 'कलम १९(१)(अ)' (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) अंतर्गत, इंटरनेट वापरण्याचा अधिकार हा लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाचा 'मूलभूत हक्क' असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मुलांची सुरक्षा आणि त्यांचे स्वातंत्र्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी नसून त्या दोन्ही एकत्र जपणे गरजेचे आहे, असे परखड मत न्यायालयाने मांडले आहे.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी केली. इंटरनेट आणि सोशल मीडियावरून मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह मजकूर हटवण्यासाठी कडक यंत्रणा उभारण्याचे निर्देश देताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. मुलांना इंटरनेट वापरण्यापासून पूर्णपणे रोखणे चुकीचे असून, त्याऐवजी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'चाइल्ड मोड'सारखे सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देऊन त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे, असे सूचक मत खंडपीठाने व्यक्त केले.



आपल्या आदेशात सुप्रीम कोर्टाने नमूद केले की, संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर फक्त मोठ्यांचाच हक्क नाही, तर कोणत्याही वयातील मुलांचाही त्यावर तितकाच अधिकार आहे. एखाद्या ठरावीक वयाखालील मुलांना समज नसते किंवा त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसते, असा विचार करून त्यांना या अधिकारांपासून पूर्णपणे दूर ठेवणे अयोग्य आहे. मुलांचे संरक्षण करणे जितके गरजेचे आहे, तितकेच त्यांचे स्वातंत्र्य जपणेही आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधात नसून, आपण मुलांना सुरक्षा आणि स्वातंत्र्य दोन्ही दिले पाहिजे.

सध्याचे इंटरनेट मुलांच्या सुरक्षेसाठी धोकेदायक ठरू शकते, हे न्यायालयाने मान्य केले. मात्र, जर ऑनलाइन कंपन्या आक्षेपार्ह किंवा धोकादायक मजकूर हटवण्यात अपयशी ठरत असतील, तर त्याची शिक्षा मुलांना देऊन त्यांच्या इंटरनेट वापरावरच बंदी घालणे योग्य नाही. ही तर समस्येसाठी पीडितालाच दोषी ठरवण्यासारखी गोष्ट होईल, असे न्यायालयाने ठामपणे सांगितले. संविधानातील 'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'मध्ये नवीन माहिती मिळवणे, शिकणे आणि आपले विचार मांडणे या सर्व गोष्टींचा समावेश होतो, याकडेही कोर्टाने लक्ष वेधले.

इंटरनेट हे केवळ माहितीचे साधन नसून ज्ञान, सर्जनशीलता आणि विचारांची देवाणघेवाण करण्याचे मोठे व्यासपीठ आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील मुलांसाठी इंटरनेट हे शिक्षणाचे आणि नवीन गोष्टी शिकण्याचे एकमेव साधन ठरत आहे. याशिवाय, विशेष गरजू मुलांसाठी इंटरनेट हे असे एक माध्यम आहे, जिथे ते त्यांच्यासारख्या इतर मुलांशी जोडले जाऊ शकतात आणि आपले अनुभव शेअर करू शकतात. त्यामुळे इंटरनेट बंद करणे हा उपाय असू शकत नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.

# लोहगड केतन अग्रवाल मृत्यूप्रकरणात अखेर ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकमांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आधी अपघात आणि नंतर खून झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलेल्या पुण्यातील लोहगड हत्याप्रकरणात आता ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणात केतनची होणारी पत्नी सियासह तिच्या बॉयफ्रेंडला पोलिसांनी अटकही केली असून तब्बल ५,०५३ पानांचे आरोपपत्र (चार्जशीट) न्यायालयात दाखल केले आहे. या चार्जशीटमध्ये तपासातील सर्व माहिती आणि घटनेच्या आधी व नंतर केलेल्या डिजिटल सर्चची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. दुसरीकडे याप्रकरणात ज्येष्ठ विधिज्ञ उज्जल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आलीय.

लोहगड येथील केतन अग्रवाल खून प्रकरणात आता महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. या प्रकरणात



विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती केतनच्या वडिलांनी दिली. त्यामुळे या खटल्याच्या पुढील कायदेशीर प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. केतन अग्रवाल यांच्या हत्येप्रकरणी न्याय मिळावा आणि खटल्याची प्रभावीपणे बाजू मांडली जावी, अशी अपेक्षा त्यांच्या कुटुंबीयांकडून व्यक्त केली जात आहे. उज्ज्वल निकम यांच्यासारख्या ज्येष्ठ वकिलांची नियुक्ती झाल्यानंतर या प्रकरणाला कायदेशीर स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, या नियुक्तीबाबत समाधान व्यक्त करत आणि आपल्या मुलाला न्याय मिळण्याच्या अपेक्षा वाढल्याचे सांगत अग्रवाल कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. दरम्यान, केतनच्या गूढमय हत्याप्रकरणात उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केतनच्या वडिलांनी केली होती. त्यानुसार, आता निकम यांची नियुक्ती झाली आहे.

# झोपेतच कुटुंबातील ५ जणांचा संशयास्पद मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उत्तर प्रदेश: उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे एकाच कुटुंबातील ५ जणांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे, ज्यामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृतांमध्ये आई-वडील आणि तीन मुलांचा समावेश आहे. प्राथमिक अंदाजानुसार, विषारी पदार्थ खाल्ल्यामुळे हा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून, पोलिसांनी सर्व शव ताब्यात घेऊन ती पोस्टमार्टमसाठी पाठवली आहेत.

ही भीषण घटना ग्रेटर नोएडाच्या रबूपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नगला श्रीपदम या गावात घडली आहे. येथे राहणारे महेश हे त्यांची पत्नी ललिता आणि तीन मुले - लड्डू, मिष्टी आणि साक्षात यांच्यासोबत राहत होते. या सर्वांचाच संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला आहे. पोलिसांना आज शनिवारी सकाळी याबद्दलची माहिती मिळाली. माहिती मिळताच स्थानिक पोलीस दल, उच्च अधिकारी, रुग्णवाहिका आणि अन्न व औषध प्रशासन (फूड अँड सेफ्टी) विभागाची टीम तातडीने घटनास्थळी पोहोचली.

**उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे घडली दुर्घटना**

पोलिसांची फील्ड युनिट आणि फॉरेन्सिक टीमने घटनास्थळाची कसून पाहणी करून वैज्ञानिक पुरावे गोळा केले आहेत. पोलिसांनी सर्व पाचही शव ताब्यात घेऊन ती पोस्टमार्टमसाठी पाठवून दिली आहेत. त्यांचा मृत्यू नेमका कसा झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, या कुटुंबाने रात्रीच्या वेळी नूडल्स खाल्ले होते, असे सांगितले जात आहे.

प्राथमिकदृष्ट्या हे प्रकरण 'फूड पॉइजनिंग'चे असावे, असा संशय व्यक्त केला जात आहे. शेजारील लोकांच्या आणि मृत महेशच्या आईच्या म्हणण्यानुसार, कुटुंबातील सदस्यांनी रात्रीच्या वेळी नूडल्सचे सेवन केले होते, त्यानंतर आज सकाळी ते सर्वजण मृत अवस्थेत आढळले. मात्र, मृत्यूचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.

पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून कुटुंबीयांकडेही विचारपूस केली जात आहे. सकाळी घरामध्ये कोणतीही हालचाल न झाल्यामुळे या घटनेचा उलगडा झाला, असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट आणि इतर वैज्ञानिक तपासाच्या आधारावर पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत. याशिवाय इतर बाजूंनीही या प्रकरणाचा तपास केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, रुग्णवाहिका आणि अन्न विभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस आणि फॉरेन्सिक टीमने घराची पाहणी करून खाण्या-पिण्याच्या वस्तूंचे नमुने गोळा केले. प्राथमिक तपास आणि मृत महेशच्या आईच्या वक्तव्यानुसार, कुटुंबाने रात्रीच्या वेळी नूडल्स खाल्ले होते. त्यामुळे विषारी अन्न खाल्ल्याने (फूड पॉइजनिंग) ही घटना घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोस्टमार्टम रिपोर्ट आल्यानंतरच वास्तविक कारण समोर येईल.

प्रशासनने तातडीने कारवाई करत पाचही जणांच्या मृतदेहांचा पंचनामा करून ते पोस्टमार्टमसाठी पाठवले आहेत.

पोस्टमार्टम रिपोर्ट आणि फॉरेन्सिक तपासाचा अहवाल आल्यानंतरच मृत्यूच्या खऱ्या कारणांचा खुलासा होईल, असे पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. सर्व लोकांचा मृत्यू नक्की कशामुळे झाला, हे स्पष्ट करण्यासाठी पोलीस या प्रकरणाचा प्रत्येक कोनातून कसून तपास करत आहेत.

## सार्वजनिक आरोग्य विभागाचे निर्देश; मराठी व इंग्रजीत दरपत्रक आवश्यक

# खासगी रुग्णालयांना सेवा-सुविधांचे दर ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ ऑक्टोबर २०२६ ला जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व खासगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांना वैद्यकीय सेवा व उपलब्ध सुविधांचे दर रुग्णांना सहज दिसतील, अशा ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक केले आहे. यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना उपचारांच्या संभाव्य खर्चाची पूर्वकल्पना मिळून वैद्यकीय खर्चाचे नियोजन करता येणार आहे.

केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. मुंबई शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९




अंतर्गत नोंदणीकृत खासगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांनी महाराष्ट्र नर्सिंग होम नियमावली, २०२१ मधील अनुसूची तीनमध्ये नमूद सेवा व सुविधांचे दर प्रदर्शित करावेत. या नियमावलीनुसार क्लिनिकल आणि रुग्णालयीन सेवांचे दर दर्शनी भागात प्रदर्शित करणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे.

दरपत्रक मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये असावे. ते रुग्णालयाच्या आवारातील महत्त्वाच्या, स्पष्टपणे नजरेस पडणाऱ्या आणि सहज पोहोचता येणाऱ्या ठिकाणी लावावे. रुग्णालयाने दरांमध्ये बदल केल्यास दरपत्रक तात्काळ अद्ययावत करावे.

देयकांबाबतच्या तक्रारी टाळण्यासाठी रुग्णांना लागू सेवा शुल्क आणि विविध पॅकेजच्या दरांची पुरेशी माहिती द्यावी. नोंदणी कक्ष, चौकशी कक्ष आणि बिलिंग काउंटरवरील कर्मचाऱ्यांनी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना दरपत्रक आणि शुल्काबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे. मेडिकल व्हिसा किंवा आयुष व्हिसावर भारतात उपचारांसाठी येणाऱ्या परदेशी रुग्णांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांनी त्यांच्यासाठी लागू असलेले विशेष पॅकेज दरही स्पष्टपणे प्रदर्शित करावेत.

रुग्णालयांची नोंदणी, नियमन आणि देखरेख करणाऱ्या सक्षम प्राधिकरणांनी दरप्रदर्शनाच्या नियमांच्या अनुपालनाचा वेळोवेळी आढावा घ्यावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिकांच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी हे परिपत्रक त्यांच्या कार्यक्षेत्रातील खासगी रुग्णालये व अन्य वैद्यकीय आस्थापनांच्या निदर्शनास आणून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे शासन निर्णयात नमूद केले आहे.

# सीजेपीच्या अभिजीत दिपकेंची सशर्त जामिनावर सुटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रमुख अभिजीत दिपके यांची पीस बाँड लिहून दिल्यानंतर सशर्त जामिनावर मुक्त करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतले होते. शुक्रवारी 'कनॉट प्लेस' येथे 'लेहरा दो तिरंगा' (तिरंगा फडकवा) मोर्चा काढण्यास मनाई करणारी नोटीस पोलिसांनी त्यांना दिली होती, परंतु त्यांनी ती मानण्यास नकार दिला होता. महात्मा गांधींचा फोटो असलेला पांढरा टी-शर्ट घातलेले अभिजित दिपके काल 'नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)'चे प्रवक्ते अनिश गावंडे यांच्या करोल बाग येथील निवासस्थानातून बाहेर पडले. त्यानंतर पाच मिनिटांतच त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.



यावेळी त्यांनी मी एकटाच आहे, तुम्ही मला का थांबवत आहात? असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यानंतर त्यांनी तिरंगा बाहेर काढून फडकवला, तेव्हाच पोलिसांनी त्यांना ढकलत पोलीस व्हॅनमध्ये बसवले आणि तिथून नेले. दुसरीकडे, 'कॉकरोच जनता पार्टी'ने असा आरोप केला होता की, दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर अभिजीत दिपके कुठे आहेत, याची माहिती नसल्याचे म्हटले होते. दुसरीकडे, 'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन'ने सांगितले की, त्यांची अध्यक्ष नेहा बोरा यांच्या ठिकाणाबाबत काही तास अनिश्चितता होती, मात्र नंतर त्या आर. के. पुरम पोलीस ठाण्यात असल्याचे समजले.

'आयसा'ने 'एक्स' वर पोस्ट करत विचारले, दिल्ली पोलीस नेहा यांना मध्यरात्रीपर्यंत पोलीस ठाण्यात का ठेवत आहेत? त्यांची सुटका कधी होणार? एका महिला विद्यार्थी नेत्याला मध्यरात्री पोलीस ठाण्यात का ठेवले जात आहे? 'सीजेपी'नेही 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले, दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांना अज्ञात स्थळी नेले आहे. आमचा त्यांच्याशी संपर्क तुटला आहे. त्यांना वकिलांशीही बोलू दिले जात नाहीये. 'सीजेपी'ने पुढे प्रश्न उपस्थित केला, अभिजीत हातात तिरंगा घेऊन घराबाहेर पडत होते! हातात तिरंगा घेऊन चालणे हा गुन्हा कसा असू शकतो? त्यांनी असेही नमूद केले की, अशा प्रकारे ताब्यात घेतल्यामुळे लोक आंदोलनात सहभागी होण्यापासून थांबणार नाहीत.

## मंदिर समितीच्या गोशाळेतील पशुखाद्यासाठी एक लाख रुपयांची देणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : बीड येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सीम भक्त रविंद्र रामचंद्र साखरे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या गोशाळेतील गाई व वासरांच्या पशुखाद्यासाठी आज, दि. १४ ऑक्टोबर रोजी एक लाख रुपयांची देणगी अर्पण केली.

मंदिर समितीच्या 'गोशाळा पशुखाद्य कायम ठेव' या योजनेसाठी सदर देणगी देण्यात आली आहे. या देणगीतून मंदिर समितीच्या गोशाळेतील गाई व वासरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीची गोशाळा पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील यमाई तलाव परिसरात असून, या गोशाळेमध्ये लहान-मोठ्या मिळून एकूण २५५ गाई व वासरे आहेत. या गोशाळेतील गोवंशाला नियमितपणे चारा व पशुखाद्य उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या संगोपनास हातभार लागावा, या उदात्त भावनेतून साखरे यांनी आपल्या जमापुंजीतून ही देणगी दिली आहे.

या देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने देणगीदार यांचा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार साखरे यांचे कुटुंबीय उपस्थित होते. रवींद्र साखरे हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सीम भक्त असून, ते नियमितपणे पंढरपूर येथे दर्शनासाठी येत असतात. 'गोसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून त्यांनी गोशाळेतील गाई व वासरांच्या चारा-पाण्याच्या व्यवस्थेसाठी दिलेली ही देणगी गोवंश संगोपनाच्या कार्याला निश्चितच हातभार लावणारी आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या गोशाळेतील गाई व वासरांच्या संगोपनासाठी तसेच पशुखाद्य व चाऱ्याच्या व्यवस्थेसाठी देणगी देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समितीच्या वतीने ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींनी देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाविकांना रोख स्वरूपात, धनादेश (चेक), डिमांड ड्राफ्ट (डीडी), क्यूआर कोड स्कॅन करून तसेच आरटीजीएस (RTGS) या बँकिंग प्रणालीद्वारे देणगी अर्पण करता येते. याशिवाय, मंदिर समितीने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून तसेच मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरूनही भाविकांना देणगी देता येते.

### नवरात्र महोत्सव: सातवी माळ

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री. महालक्ष्मी माता पोशाख सह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात झाली आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे सातव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस महालक्ष्मी पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.













श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, लक्ष्मी हार, हायकोल, तुळशीची माळी एक पदरी, शाळीग्राम हार, शिरपेच लहान, नामनिळाचा, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगनजोड, कौस्तुभ मणी, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी दोन पदरीम, तोडेजोड, मस्त्य जोड इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस मोठी नथ, कर्ण फुले, मत्स्य जोड, पैंजणजोड, रुळजोड, पुतळ्यांची माळ, सूर्य, सोन्यामोत्याचे ताणवड, मन्यामोत्याच्या पाटल्या, जडावाचे बाजूबंद जोड, चंद्रहार मोठा, घुंगराचा कंठा, चंद्रहार, अष्टपैलू मण्याची कंठी, ठुशी, कलमाडी बाजूबंद, चिंचपेटी हिरवी, बाजीराव गरसोळी, खड्यांची वेणी, दशावतारी साज इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस नक्षी टोप, जवेची माळ, चिंचपेटी तांबडी, जवमनी पदक, जवेची माळ, मोहरांची माळव *सत्यभामादेवीला सिद्धेश्वर टोप, पुतळ्यांची माळ, हायकोल, जवेची माळ, लक्ष्मीहार, पुतळ्यांची माळ अलंकार व श्री. व्यंकटेशास चांदीची काठी, छत्री इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

## दुष्काळ भयंकर! शेतकऱ्यांना हेक्टरी ६० हजारांची मदत द्या - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब : मराठवाड्यात यंदा पावसाअभावी शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. ही परिस्थिती १९७२ च्या दुष्काळासारखी असल्याचे सांगत शेतकऱ्यांना हेक्टरी ५० ते ६० हजार रुपये, तर शेतमजुरांना दिवाळीसाठी १० ते १५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. मराठवाड्याच्या दुष्काळी दौऱ्यादरम्यान त्यांनी कळंब येथे माध्यमांशी संवाद साधला. रामदास आठवले सध्या मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दौऱ्यावर आहेत. छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांना भेट देऊन ते परिस्थितीची माहिती घेत आहेत. पावसाने ओढ दिल्याने शेतातील पिके जळून गेली असून, शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि केंद्र सरकारने तातडीने मदत देण्याची गरज आहे आणि त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आठवले यांनी सांगितले.

दुष्काळाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसलेला नसून, शेतमजुरांची परिस्थितीदेखील अत्यंत बिकट झाली आहे. शेतीतील कामे कमी झाल्याने त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसोबतच शेतमजुरांनाही आर्थिक मदत मिळाली पाहिजे, अशी भूमिका आठवले यांनी मांडली. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० ते ६० हजार रुपये नुकसानभरपाई आणि दिवाळी सणासाठी शेतकरी व शेतमजुरांना १० ते १५ हजार रुपयांची मदत देण्यात यावी, अशी मागणी आमच्या पक्षाच्या वतीने करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या मागण्यांसाठी आपण प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मराठवाड्यातील दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्याकडे शेतकरी व शेतमजुरांना मदत देण्याची मागणी करणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. राज्य आणि केंद्र सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी राजाभाऊ ओव्हाळ, डी. जी. हौसलमल, युवक तालुकाध्यक्ष विपीन हौसलमल, बंडू बनसोडे, राहुल हौसलमल, सतपाल बनसोडे, शिवाजी शिरसाठ यांच्यासह रिपब्लिकन पक्षाचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## कळंब येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा दुष्काळी दौरा; लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) - केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले साहेब हे धावत्या दौऱ्या दरम्यान आज कळंब शहरात आले असता त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने त्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनता, शेतमजूर आणि विद्यार्थी आर्थिक संकटात सापडले असून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मागण्या मध्ये महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना थेट कर्ज व बीज भांडवल मिळावे, भूमिहीन शेतमजूर व असंघटित कामगारांना आर्थिक अनुदान मिळावे, दुष्काळ लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे, गोरगरीब कुटुंबांचे मायक्रोफायनान्स कर्ज माफ करावे किंवा सवलत द्यावी, दुष्काळग्रस्तांना विशेष आर्थिक मदत जाहीर करावी आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाप्रमुख राजाभाऊ गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष भिवाजी ताकपेरे, तालुकाप्रमुख कृष्णा खुणे, बाबासाहेब कसबे, शहर प्रमुख बाबा टोपे उपस्थित होते.



## केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांचे कळंब शहरात महायुतीच्या वतीने जोरदार स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) - केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदासजी आठवले साहेब हे धावत्या दौऱ्या दरम्यान कळंब शहरात आले असता महायुतीच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी भाजपा नेते सतपाल बनसोडे, रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष अनिल हजारे, राहुल हौसलमल, बंडूभाऊ बनसोडे, सुनील गायकवाड, शिवाजी शिरसाट, किशोर वाघमारे, राजाभाऊ गायकवाड, सुमित रणदिवे यांच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी महायुतीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाळवणीत सप्तश्रुंगी नवरात्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथे जय भवानी तरुण मंडळ संचलित सप्तश्रुंगी नवरात्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. स्वाती जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ५१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



**५१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग; रक्तदानातून जीवनदान देण्याचे आवाहन**

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती लिंगे उपस्थित होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. स्वाती जगताप म्हणाल्या की, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते. अनेक वेळा अपघातग्रस्त तसेच गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना रक्ताची तातडीने गरज असते. अशा वेळी रक्तदात्यांनी केलेले रक्तदान रुग्णांसाठी जीवनदायी ठरते. त्यामुळे प्रत्येकाने रक्तदानाचे महत्त्व समजून घेऊन या सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी डॉ. गजानन कवडे, डॉ. विनोद एकतपुरे, डॉ. नंदकुमार जगताप, डॉ. राजेंद्र लाले, डॉ. मदने आणि प्रशांत माळवदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राजेंद्र माने, जीवन कलढोणे, बाळू कलढोणे, रविंद्र कारंडे, सदाशिव वाघमारे अध्यक्ष सागर माने, उपाध्यक्ष अभिमन्यू कारंडे तसेच सप्तश्रुंगी नवरात्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार अभिषेक कारंडे यांनी मानले. मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

## खामसवाडी येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात : डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्रियदर्शनी वाचनालयात ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ग्रंथ हेच खरे गुरू, वाचनातूनच ज्ञानाची कवाडे उघडतात - अध्यक्ष बिभीषण शेळके यांचे प्रतिपादन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



हनुमंत पाटुळे खामसवाडी (प्रतिनिधी) - भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती म्हणजेच वाचन प्रेरणा दिन मौजे खामसवाडी येथील प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालयात मोठ्या उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या उपक्रमाने साजरा करण्यात आला.

दि. १५ऑक्टोबर रोजी सकाळी वाचनालयात डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष श्री. बिभीषण शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांसाठी विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

ध्याच्या मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलपेक्षा पुस्तकांशी मैत्री करावी, या उद्देशाने वाचनालयाच्या वतीने या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात डॉ. कलाम लिखित 'अग्निपंख', 'विंग्स ऑफ फायर', 'इंडिया '२०२०' सह विविध आत्मचरित्रे, प्रेरणादायी कथा, कादंबऱ्या, विज्ञानविषयक पुस्तके, स्पर्धा परीक्षा (चझडउ/णझडउ) मार्गदर्शनपर ग्रंथ, बालसाहित्य असे ५०० हून अधिक ग्रंथ मांडण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्येक ग्रंथाची ओळख ग्रंथपाल एकनाथ घाटुळे यांनी करून दिली. अनेक विद्यार्थ्यांनी यावेळी वाचनालयाचे सभासदत्वही घेतले. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष बिभीषण शेळके म्हणाले, डॉ. कलाम हे केवळ राष्ट्रपती नव्हते, तर ते एक महान शिक्षक होते. त्यांनी नेहमीच विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्यास सांगितले. पुस्तकांशिवाय माणूस घडू शकत नाही. आजच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नक्कीच वाचनाची आवड निर्माण होईल.

या वेळी या कार्यक्रमास वाचनालयाचे कोषाध्यक्ष श्री. दत्तू यादव, सचिव श्री. प्रदीप जोशी, जेष्ठ सदस्य श्री. विजय देशमाने, श्री. शांतलिंग गोरे, ग्रंथालय कर्मचारी लिपिक श्री. एकनाथ घाटोळे, रवींद्र पाटील, दत्ता भराटे, दीपक सुरवसे, गोपाळ शेळके आदी ग्रामस्थ, पालक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रदीप जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन ग्रंथपाल एकनाथ घाटुळे यांनी केले.

## पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने महत्वपूर्ण बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर - भारतीय जनता पार्टी पंढरपूर तालुक्याच्या वतीने आज कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर येथे भाजप नेते मा. आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखाली पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने महत्वपूर्ण बैठक पार पडली.

संघटन हीच ताकद, एकजूट हीच बळ आणि विजयासाठी प्रभावी नियोजन हाच आपला संकल्प!

बैठकीला पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार सौ स्मिता जाधव तसेच शिक्षक मतदार संघाचे उमेदवार प्राध्यापक कौस्तुभ गावडे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने समन्वयाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने विविध महत्त्वपूर्ण विषयावर चर्चाही करून आगामी काळातील कार्याचा नियोजन करण्यात आले. या बैठकीला माझ्यासह भारतीय जनता पार्टीचे विविध पदाधिकारी व संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष प्रमुख कार्यकर्ते आणि पक्षाचे हिंदीचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे बैठक उत्साह पूर्ण वातावरणात पार पडली. संघटन हीच ताकद, एकजूट हीच बळ आणि विजयासाठी प्रभावी नियोजन हाच आपला संकल्प!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सहानुग्रह अनुदान मिळवून देण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारकडे प्रयत्न करणार : नामदार रामदास आठवले

## सोयाबीनसाठी सर्वाधिक ४०.४६ कोटी रुपयांचा विमा हप्ता; एकूण विमा हप्ता ६६.४० कोटी रुपये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के.गायकवाड) : भविष्यात दुष्काळाचा सामना करायचा असेल तर महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील नदीजोड प्रकल्प देश पातळी राबविणे. ही काळाची गरज आहे असून सध्या महाराष्ट्रात त्यातल्या त्यात मराठवाड्यामध्ये भिषण दुष्काळ पडला असून शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेआहे. शिवाय पर्जन्यमान एकदम कमी झाल्यामुळे रब्बी हंगामातील पिकेही शेतकऱ्यांच्या हाताला लागणार नाहीत त्यामुळे शेतकरी हा आर्थिक संकटात सापडलेला असून जनावराच्या चारा पाण्याचा ही प्नश्न निर्माण झालेला आहे. तसेच भुमिहीन शेतमजुरांच्याही हाताला काम मिळत नाही.याचा सारासार विचार करून विचार करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सहानुग्रह अनुदान मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे व राज्य सरकारकडे रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून आपण प्रयत्न करणार, तसेच शेतमजुरांच्या रिकाम्या हाताला रोजगार मिळवून देण्यासाठी रोजगार हमी सारख्या योजना प्रभावीपणे राबवून शेतमजूर कुटुंबांना आर्थिक मदतीची सोय करण्यासाठी शासनाकडे प्रयत्न केला जाईल असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारता राज्य मंत्री भारत सरकार तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले यांनी धाराशिव येथे आयोजित कोरडा दुष्काळ पत्रकार परिषदेत बोलतान केले.

दि. १६ व १७ ऑक्टोबर २०२६ रेजी नामदार रामदासजी आठवले हे दुष्काळाची पहाणी करण्यासाठी मराठवाड्याच्या दौऱ्यावर आले असून दिनांक १७ ऑक्टोबर रोजी धाराशिव येथिल पुष्पक हॉटेल सभागृहात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने कोरडा दुष्काळ परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नामदार रामदास आठवले हे पत्रकारांशी वार्तालाप करताना बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेतमजुरांना अधिक भरीव आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न तर करणारच आहे. परंतू या भिषण दुष्काळाचा सामना करण्यासाठी समाजातल्या सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात मदत करणे गरजेचे आहे. विविध राजकीय पक्ष, सेवाभावी संस्था,संघटना व अनिल अंबानी,मुकेश अंबानी,किर्लोस्कर अशा मोठ्या उद्योगपती कडून या दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना व शेत मजुरांना विविध प्रकारे मदत करणे काळाची गरज आहे.

सध्या चालू असलेल्या मत चोरी आंदोलना संदर्भात अभिजीत दिपके व राहुल गांधी यांच्या आंदोलना बाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की भारतीय संविधानानुसार समाजाच्या न्यायिक प्रश्नावर आंदोलन करणे हा संविधानिक अधिकार असून त्याबद्दल आपले काही मत नाही परंतु भारतीय संविधानाने सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोग यांना स्वतंत्र स्वायत्तेचा दर्जा दिलेला असल्यामुळे त्यांच्याकडून निपक्षपातीपणे पारदर्शक काम होणे अपेक्षित आहे.या बद्दल दुमत नाही परंतु

मतदार संशोधन प्रक्रिया (SIRI)मध्ये काही मयत लोकांची तर काही दोन-तीन ठिकाणी मतदार यादीत नाव असलेले किंवा आतापर्यंत कधीच मतदान न केलेले मतदार आहेत.त्यांची नावे वगळण्यात आलेली आहेत. त्यात चुकून एखाद्याचं नाव वगळल असेल तर ते नाव समाविष्ट करण्याची प्रक्रियाही सुरू आहे.त्यामुळे सर्व बाबीची शहानिशा होणे गरजेचे आहे.अभिजीत दिपके आणि राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या अटकेबाबत विचारले असता परिस्थितीची गांभीर्यता ओळखून काही वेळेला परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शासनाला असे निर्णय घ्यावे लागतात आम्ही सुद्धा दलित पँथरच्या माध्यमातून, रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून अनेक आंदोलने केलेली आहेत करीत आहेत अनेक वेळा आम्हालाही अटक झालेली आहे तेव्हां या आटकेच आपण समर्थन करित नसून परिस्थितीनुसार घेतलेला हा पोलीस प्रशासनाचा निर्णय असावा असे मत त्यांनी व्यक्त केले.




या वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजा भाऊ ओव्हाळ,महाराष्ट्र प्रदेश सचिव संजय बनसोडे, जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे, मराठवाडा विभाग उपाध्यक्ष भागवत शिंदे सह जिल्ह्यातील तमाम रिपब्लिकन पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीची अक्कलकोटमध्ये नियोजन बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रा. सोमनाथ साळुंखे आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार डॉ. इकबाल शेख यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी अक्कलकोट तालुका कमिटीची बैठक आज संपन्न झाली. या बैठकीत तालुक्यातील प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी प्रचाराची रणनीती आखण्यात आली.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी तालुक्यातील प्रत्येक मतदाराशी संपर्क साधावा, तसेच बूथस्तरीय कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचून उमेदवारांचा प्रचार करावा, अशा सूचना या बैठकीत देण्यात आल्या. प्रचाराचे नियोजन, कार्यकर्त्यांची जबाबदारी आणि मतदारांशी संपर्क वाढविण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला सोलापूर जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, अक्कलकोट तालुकाध्यक्ष विशाल ठोंबरे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे, महासचिव नितीन शिवशरण, संतोष बाळशंकर, दादा गायकवाड, यशवंत इंगळे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष साहिल कांबळे, महासचिव नागेश हरवाळकर, युवक आघाडीचे शहराध्यक्ष संदीप बाळशंकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष देवानंद अस्वले, शिवाजी चौगुले, आदित्य सूर्यवंशी, तालुका उपाध्यक्ष श्याम बनसोडे आणि संघटक नरसिंग गायकवाड यांच्यासह विविध शाखांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाड चवदारतळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




महाड चवदारतळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त आणि महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक न्याय, समता आणि मानवी हक्कांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सार्वजनिक उपक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांच्या वतीने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांतील पात्र पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येणार असून, राज्यस्तरावर प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे ५० हजार, ४० हजार आणि ३० हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. पदवी आणि पदव्युत्तर या दोन्ही गटांसाठी विद्यापीठ स्तरावर स्वतंत्र पारितोषिके देण्यात येतील. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे १० हजार, ७ हजार ५०० आणि ५ हजार रुपये रोख रक्कम व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाइन नोंदणी करावी. मराठी किंवा इंग्रजी भाषेत स्वहस्ताक्षरात लिहिलेला निबंध ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत सादर करण्यासाठी आणि स्पर्धेचे नियम, अटी व सविस्तर माहितीसाठी https://dbaspratishthan.in या अधिकृत संकेतस्थळा भेट द्यावी.

कृषी, पशुविज्ञान, मत्स्यविज्ञान आणि आरोग्यविषयक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाची मूल्ये रुजविण्यास हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# प्रख्यात ज्योतिषाचे अंनिस समोर लोटांगण: पोलिसांत लिहून दिला माफीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी - नाशिक: पंचवटी येथील एक ज्योतिषी चर्चेत असतो . चमत्काराचा दावा करून पाच पैशाचा काळा धागा तो नऊशे रुपयांना विकत होता.अंनिसने पोलीस ठाण्यात तक्रार केल्याने त्याने सफशेल माघार घेऊन माफीनामा लिहून दिला.

नवरात्री निमित्त त्याने मंत्रासिद्धी केलेला काळा धागा उजव्या मनगटावर बांधल्यास नकारात्मक ऊर्जा नष्ट होते व कार्यसिद्धी होते, असा दावा त्याने समाजमाध्यमातून केला होता . अनेकांना त्यामुळे गुण आल्याचे पुरावे त्याने व्हॉट्सअप वर स्टेटसला ठेवले होते.

अंनिसने त्यावर तीव्र आक्षेप घेत अशी मंत्रशक्ती सिद्ध करण्याचे आव्हान दिले व पंचवटी पोलिस ठाण्यात निवेदन दिले. पंचवटी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनिल पवार यांनी त्याला पोलिस ठाण्यात बोलावून बँक खाते तपासून व इतर बाबींची चौकशी केली.चौकशीअंती सदर ज्योतिषीशाचे कृत्य हे गुन्हा असल्याचे निष्पन्न झाले . अंनिस कार्यकर्ते, पोलिस व ज्योतिषी यांची चर्चा झाली. कार्यकर्त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्याचे समुपदेशन केले. सदर गुन्हा व्यवसायवाढीसाठी चुकीने केल्याचे मान्य केले.परत करत करणार नाही असे ज्योतिषाने कबूल केले. गुन्हा दाखल करण्यासाठी कार्यकर्त्यांच्या तांत्रिक अडचणी असल्याने ज्योतिषाला सुधारण्याची संधी दिली. पुढे असे कोणतेही कृत्य करणार नसल्याचे त्याने पोलिस ठाण्यात लिहून दिले. अंनिस कार्यकर्त्यांनी त्याला फलज्योतिष हे शास्त्र असल्याचे विज्ञानाच्या कसोटीवर सिध्द केले तर एकवीस लाख रुपये जिंकण्याचे आव्हान दिले.पण त्यातही त्याने सफशेल माघार घेतली.यामुळे समाजाची होणारी फसवणूक थांबली आहे. यावेळी अंनिसचे कृष्णा चांदगुडे, प्रल्हाद मिस्त्री,प्रा.आशा लांडगे, महेंद्र दातरंगे, कोमल वर्दे व रंजन लोंढे उपस्थित होते. अशी कुणाची फसवणूक झाली असल्यास त्यांनी अंनिस किंवा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. फलज्योतिष हे थोतांड असून स्वप्न विकण्याची कला आहे. फलज्योतिष हे कायद्याच्या कक्षेत नसले तरी अनेक ज्योतिषी गुन्हा ठरतील अशा अंधश्रद्धायुक्त कृती करत असतात. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर फसवणूक करणाऱ्या अशा प्रकारावर आमचे लक्ष राहील

- कृष्णा चांदगुडे,
राज्य कार्यवाह, अंनिस
(अधिक माहितीसाठी संपर्क :
कृष्णा चांदगुडे, मो-९८२२६३०३७८)

# पं. शौनक अभिषेकी आणि अभेद अभिषेकी यांच्या स्वराभिषेकाने विठुरायाच्या चरणी गायनसेवा समर्पित




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवातील पाचव्या स्वरमाळेत उदयोन्मुख गायक चैतन्य देशपांडे यांनी आपल्या सुरेल गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले, तर पद्मश्री पं. जितेंद्र अभिषेकी यांचे सुपुत्र व शिष्य पं. शौनक अभिषेकी आणि अभेद अभिषेकी यांनी शास्त्रीय संगीत, अभंग व नाट्यगीतांच्या सादरीकरणातून विठुरायाच्या चरणी गायनसेवा समर्पित केली. कार्यक्रमाची सुरुवात व्यवस्थापक प्रवीणकुमार घम व मान्यवर कलाकारांच्या हस्ते विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी सर्व कलाकारांचा मंदिर समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

पहिल्या सत्रात चैतन्य देशपांडे यांनी राग पुरीया कल्याण सादर केला. त्यानंतर 'जय जय राम कृष्ण हरी', 'नाम घेऊ नाम गाऊ', 'चिंचेच्या पानावर', 'मना लागलिया छंद' आणि 'जय दुर्गे दुर्गती परिहारिणी' या रचनांसह 'विठ्ठल विठ्ठल गजरी' या भैरवीने त्यांनी गायनाची

### चैतन्य देशपांडे यांच्या सुरेल गायनाने रसिक मंत्रमुग्ध

सांगता केली. दुसऱ्या सत्रात पं. शौनक अभिषेकी आणि अभेद अभिषेकी यांनी राग झिंझोटी सादर करून रसिकांना शास्त्रीय संगीताची मेजवानी दिली. 'पंढरीचे सुख चंद्रभागे तटी', 'हे सुरांनो चंद्रमा', 'कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर' आणि 'विठ्ठलाच्या पायी थरारली वीट' यांसारख्या लोकप्रिय रचनांनी मैफलीत रंग भरला. हार्मोनियमवर उदय कुलकर्णी, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे, तबल्यावर संकेत जोशी आणि टाळावर माऊली पिसे यांनी सुरेल साथसंगत केली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.

महोत्सवाच्या पुढील दोन दिवसांत स्थानिक कलाकार तसेच भरतनाट्यम वर्गातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण होणार असून, रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

---

**कृषी विभाग, कृषी निविष्ठा विक्रेते आणि शेतकरी गटांचा श्रमदानातून जलसंधारणाचा उपक्रम**

# वापे येथे वनराई बंधाऱ्याची उभारणी; आदिवासी शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे प्रतिनिधी मिलिंद जाधव - बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या उद्देशाने भिवंडी तालुक्यातील आदिवासीबहुल वापे गावात वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. कृषी विभागाचे अधिकारी, कृषी निविष्ठा विक्रेते आणि स्थानिक शेतकरी गटांनी एकत्र येत श्रमदानातून जलसंधारणाचा हा उपक्रम राबविला. आगामी रब्बी हंगामात भाजीपाला लागवडीसाठी पाण्याचा उपयोग व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

यंदाच्या खरीप हंगामात प्रतिकूल हवामानामुळे भातपिकाला फटका बसल्याने शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. त्यातच अलनिनोच्या संभाव्य परिणामांमुळे पाणीटंचाईची चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत पावसाचे उपलब्ध पाणी अडवून त्याचा शेतीसाठी उपयोग करणे महत्त्वाचे ठरत आहे. याच विचारातून वापे येथे वनराई बंधारा उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला.

भिवंडी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, गुण नियंत्रण शाखा, ठाणे जिल्हा ग्रो डीलर वेल्फेअर असोसिएशन आणि तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. ठाणे जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे यांनी उपस्थित राहून प्रत्यक्ष श्रमदान केले. वनराई बंधाऱ्यांमुळे उपलब्ध पाण्याचा शेतीसाठी उपयोग करून घेण्यास मदत होऊ शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या उपक्रमात भिवंडीचे तालुका कृषी अधिकारी डी. सी. शिंदे, गुण नियंत्रण निरीक्षक विवेक के. दोंदे, उपकृषी अधिकारी बी. जी. गायकवाड, सहायक कृषी अधिकारी टी. एस. राऊत, एच. डी. पाटील, डी. एम. गावंडा आणि एन. के. बुजर यांनी सहभाग घेतला.

ठाणे जिल्हा ग्रो डीलर वेल्फेअर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष समीर ठाकरे यांच्यासह मधुकर पाटील, सुधीर पाटील, जितेंद्र बांगर, दीपेश पाटील, काचवे आणि सूरज वारघडे या कृषी सेवा केंद्र चालकांनीही श्रमदान केले. तसेच आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा शेतकरी गट, वापे आणि माऊली महिला शेतकरी गट, दुधनी यांच्या सदस्यांसह तालुक्यातील विविध कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शेतीतील पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी लोकसहभागातून जलसंधारणाचे उपक्रम राबविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. वनराई बंधाऱ्यामुळे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वापर करून रब्बी हंगामात भाजीपाला लागवडीला आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भुरीकवठे विद्युत उपकेंद्रामुळे वागदरी परिसराला मोठा दिलासा!

## भीषण दुष्काळातही वीजपुरवठा सुरळीत; शेतकरी, व्यापारी आणि ग्रामस्थांत समाधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील अनेक गावांना सध्या वीजपुरवठ्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असताना, भुरीकवठे येथे सुरू झालेल्या ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रामुळे वागदरी, भुरीकवठे आणि परिसरातील गावांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतीपंपांसह घरगुती वीजपुरवठ्यात सुधारणा झाल्याने शेतकरी, व्यापारी आणि ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून साकारलेल्या या उपकेंद्राचा परिसरातील नागरिकांना लाभ होत आहे.





शिरवळ उपकेंद्रावरील भार झाला कमी

दोन वर्षांपूर्वी शिरवळ येथील जुन्या ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रावर वीजभार वाढल्यामुळे वागदरी व भुरीकवठे परिसरातील शेतकरी आणि सामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. वारंवार उद्भवणाऱ्या वीज समस्यांमुळे शेतीची कामे, शेतीपंपांचा वापर आणि दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत होता.

परिसरातील नागरिकांची ही समस्या लक्षात घेऊन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी भुरीकवठे येथे स्वतंत्र ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्र मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर डिसेंबर २०२३ मध्ये हे उपकेंद्र सुरू करण्यात आले. त्यामुळे शिरवळ येथील मुख्य विद्युत उपकेंद्रावरील भार कमी होण्यास मदत झाली आणि परिसरातील वीजपुरवठा सुधारण्यास हातभार लागला.

चार गावांना स्वतंत्र उपकेंद्राचा लाभ

भुरीकवठे येथील विद्युत उपकेंद्रातून गोगाव, खैराट, किरनळ्ळी आणि भुरीकवठे या चार गावांना वीजपुरवठा केला जात आहे. या उपकेंद्रामुळे संबंधित गावांतील वीजपुरवठ्यात सुधारणा झाली असून, शिरवळ उपकेंद्रावरील ताणही कमी झाला आहे. याचा सकारात्मक परिणाम वागदरी व शिरवळ परिसरातील वीजपुरवठ्यावर झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

दुष्काळात सुरळीत वीजपुरवठ्याचे महत्त्व

सध्या अक्कलकोट तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाणीटंचाई, पिकांची झालेली दयनीय अवस्था आणि वाढत्या शेतीखर्चामुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत शेतीपंपांसाठी सुरळीत वीजपुरवठा होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

वीजपुरवठ्यात वारंवार अडथळे निर्माण झाल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढतात. त्यामुळे भुरीकवठे येथील स्वतंत्र विद्युत उपकेंद्रामुळे वीजपुरवठा सुरळीत राहण्यास मिळालेली मदत शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. याशिवाय व्यापारी आणि घरगुती वीजग्राहकांनाही त्याचा फायदा होत आहे.

एकेकाळी वीज समस्यांबाबत महावितरण कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागणारे शेतकरी, व्यापारी आणि ग्रामस्थ आता वीजपुरवठ्यात झालेल्या सुधारणेबद्दल समाधान व्यक्त करत आहेत.

**भुरीकवठे येथे स्वतंत्र विद्युत उपकेंद्र सुरू झाल्यापासून परिसरातील शेती आणि घरगुती वीजपुरवठा सुरळीत सुरू आहे. त्यामुळे या भागातील शेतकरी, व्यापारी आणि ग्रामस्थांना वारंवार उद्भवणाऱ्या वीज समस्यांपासून दिलासा मिळाला आहे.**
**– अमोल धर्मसाले, ऑपरेटर, भुरीकवठे विद्युत उपकेंद्र**

### वागदरी जिल्हा परिषद गटात शेतकऱ्यांचे वीज समस्या मिटले

**वागदरी जिल्हा परिषद गटात वीज समस्या मोठ्या प्रमाणात होते हिवाळ्यामध्ये शेती पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना खूप कसरत करावे लागत भूरिकवठे येथील उपकेंद्रासाठी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप भाजपाचे जेष्ठ सदस्य श्रीशैल ठोबरे यांच्या पाठपुरावाने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी सदर उपकेंद्र मंजूर करून शेतकऱ्यांची विजेची समस्या सोडवले**
**– सुनील सांवत (वागदरी)**

### स्वतंत्र उपकेंद्रामुळे वीज समस्यांवर दिलासादायक उपाय

ग्रामीण भागातील शेती, घरगुती वापर आणि लहान-मोठ्या व्यवसायांसाठी वीजपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. भुरीकवठे येथील स्वतंत्र विद्युत उपकेंद्रामुळे परिसरातील वीज वितरण व्यवस्थेला आधार मिळाला असून, वीजभाराचे योग्य नियोजन करण्यास मदत झाली आहे. दुष्काळाच्या कठीण काळात वीजपुरवठ्यात झालेली सुधारणा ही वागदरीसह परिसरातील गावांसाठी दिलासादायक बाब ठरत आहे. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या पाठपुरावाने कोरोना काळात जिल्हा एकमेव उपकेंद्र मंजूर करून शेतकऱ्यांचे विजेचे समस्या कायम मिटवले
**– सौ वनिता सुरवसे (मा सरपंच, गोगांव)**

**भुरीकवठे विद्युत उपकेंद्राला मंजुरी मिळण्यापूर्वी या भागात वीज समस्या अधिक तीव्र होत्या. हे उपकेंद्र मंजूर करून घेण्यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आल्याने आज वागदरी व भुरीकवठे परिसरातील शेतकरी आणि सामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.**
**– शंकर गुमते , ग्रामस्थ, किरनळ्ळी**

---

# विठाई संस्था व ईशुरस फायनान्शिअल कन्सल्टंट्सच्या संयुक्त विद्यमाने सीएसआर अंतर्गत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिर उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्था, पंढरपूर आणि ईशुरस फायनान्शिअल कन्सल्टंट्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उडठ) अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोहाळी (ता. पंढरपूर) येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिर शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात पार पडले. या शिबिरात शाळेतील तब्बल १८२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.





कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोहाळीचे मुख्याध्यापक मच्छिंद्र जुंदळे सर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल चंदनशिवे, बोहाळी गावचे सरपंच शिवाजी पवार, मोरेवस्ती शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाजीराव धुमाळ, विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड, तसेच संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, शिक्षक, शिक्षिका व ग्रामस्थ उपस्थित होते.

१८२ विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी

शिबिरासाठी डॉ. क्षितिजा कदम पाटील यांनी वैद्यकीय अधिकारी म्हणून विशेष सेवा दिली. त्यांनी शाळेतील १८२ विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी करून प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्याची स्वतंत्र नोंद केली. तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये आढळलेल्या विविध आरोग्यविषयक तक्रारी व आजारांची नोंद घेण्यात आली. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना मोफत होमिओपॅथिक औषधांचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना नियमित आरोग्य तपासणीची संधी उपलब्ध होत नसल्याने अशा प्रकारचे आरोग्य शिबिर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या समस्या प्राथमिक स्तरावरच लक्षात येऊन त्यावर योग्य मार्गदर्शन व उपचाराची दिशा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

निरोगी जीवनशैलीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

यावेळी बोलताना विठाई संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि आरोग्यदायी जीवनशैलीच्या सवयी अंगीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी विठाई संस्थेच्या माध्यमातून भविष्यातही विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. क्षितिजा कदम पाटील यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत निरोगी राहण्यासाठी आवश्यक असलेल्या दैनंदिन सवयी, वैयक्तिक स्वच्छता, योग्य आहार आणि आरोग्याची नियमित तपासणी याबाबत मार्गदर्शन केले. आजारांकडे दुर्लक्ष न करता वेळेत तपासणी करून आवश्यक उपचार घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

शिक्षक, संस्थेचे सदस्य व स्वयंसेवकांचे योगदान

शिबिर यशस्वी करण्यासाठी जि.प. प्राथमिक शाळा, बोहाळी येथील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे सदस्य डॉ. सचिन लादे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजय टोणपे, ओंकार कापसे, महानंदा डोंबाळे, दिपाली सतपाल, भाग्यश्री लिहिने, रामेश्वर कोरे आणि अंजली सूनगार यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेतील प्रज्ञा कुलकर्णी, वंदना कथले, सिद्धेश्वर हिप्परकर, दत्तात्रय येडगे, सुनील अडगळे, हनुमंत ढोपे व सुप्रिया वाघमारे या शिक्षकांनी विशेष सहकार्य केले.

शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन व औषधोपचार उपलब्ध करून दिल्याबद्दल पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी विठाई संस्था व ईशुरस फायनान्शिअल कन्सल्टंट्स प्रा. लि. यांचे कौतुक व आभार व्यक्त केले.

सीएसआर उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेले हे शिबिर सामाजिक बांधिलकीचे आदर्श उदाहरण ठरले असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक जागरूकतेला या उपक्रमामुळे निश्चितच चालना मिळाली आहे.

---

# ओझर महाविद्यालयामध्ये सेवा संकल्प अभियान अंतर्गत रांगोळी स्पर्धा उत्साहात संपन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांमधील कलागुण, देशभक्ती, स्त्री पुरुष समानता, सर्जनशीलता व नवउपक्रमाला चालना देण्याच्या उद्देशाने मविप्र समाज संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग.) व महाराष्ट्र शासन सेवा संकल्प अभियान-२०२६ 'यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये रांगोळी स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी.लोखंडे यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. या स्पर्धेचे समन्वयक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुनीता उफाडे होत्या.स्पर्धेसाठी प्रमुख परीक्षक म्हणून श्रीमती जे. जे.पवार,आणि श्रीमती एस. ए. गायकवाड उपस्थित होत्या.

रांगोळी स्पर्धा उदघाटन प्रसंगी उदघाटक प्राचार्य डॉ. डी डी. लोखंडे यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांमध्ये कलागुण, स्वच्छतेचे महत्व, देशभक्ती, स्त्री पुरुष समानता, बेटी बचाव या सारखी मूल्य रुजवण्यासाठी अशा स्पर्धा महत्वाची भूमिका पार पडतात असे सांगितले .तसेच अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना अधिक चांगला वाव मिळतो असे रांगोळी स्पर्धा समन्वयक व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुनीता उफाडे यांनी उदघाटन प्रसंगी सांगितले.

रांगोळी स्पर्धेमध्ये -माझा स्वच्छ परिसर,बेटी शिक्षण, पर्यावरण संरक्षण, डिजिटल इंडिया- सेफ इंडिया, भारतीय संस्कृती आणि नवभारत या विषयावर विद्यार्थ्यांनी रांगोळ्या काढल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना साकार करता आले. या प्रसंगी कला शाखा प्रमुख प्रा. एस. के. आवारे, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. डी एस. बोराडे, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता विकास कक्ष समन्वयक डॉ. एम. डी. दुगजे, डॉ नारायण पाटील, डॉ. एम. पी. दुशिंग,ग्रंथपाल.व्ही. एल. गावले प्रा. संजय राठोड,प्रा. किरण तिडके प्रा. आर. व्ही. गांगुर्डे,डॉ. एस. बी. काळणर, श्रीमती सोनाली राजकुदल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यपकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

### अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथील घटना

# घरात घुसून महिलेवर बलात्कार करणाऱ्या तरूणास ७ वर्षाची शिक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर :- घरात घुसून शेतकऱ्याच्या पत्नीवर जबरदस्तीने बलात्कार करणाऱ्या तरूणास विशेष न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी ७ वर्षेक सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. वैजुनाथ गुरप्पा तिरगुळे (वय २५, रा. घोळसगाव, ता. अक्कलकोट) असे स शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



यातील पिडीता ही पती, मुलगा, मुलगी व सासऱ्यांसोबत तिच्या शेतात राहाते. १० एप्रिल २०१६ रोजी रात्री पिडीता ही घरामध्ये झोपली असता रात्री १२ च्या सुमारास तिला कोणीतरी हात लावला असल्याचे जाणवले. त्यामुळे पिडीतेस जाग आली. त्यावेळी वैजुनाथ तिरगुळे हा तिच्या अंगाशी झटापट करीत होता. वैजुनाथने त्याच्या नखाने पिडीतेच्या अंगावर ओरखडून, वैजुनाथने पिडीतेच्या तोंडात साडीचा बोळा कोंबून पिडीतेवर जबरदस्तीने बलात्कार केला. पिडीतेने आरडा ओरड केल्यानंतर घराबाहेर झोपलेला तिचा पती पळत घरात आला व त्याने वैजुनाथला पकडण्याचा प - यत्न केला. त्यावेळी वैजुनाथने पिडीतेच्या नवऱ्यास मारहाण करून तेथून पळ काढला. त्यानंतर पिडीतेने ११ एप्रिल २०१६ रोजी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सुर्वे यांनी आरोपी वैजुनाथ तिरगुळे यास अटक करून तपास केला व न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले.

याप्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश भस्मे यांच्यासमोर झाली. याप्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने १२ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पिडीता, डॉक्टर, तपास अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. साक्षीदारांच्या साक्षी व सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश भस्मे यांनी आरोपी वैजुनाथ तिरगुळे यास बलात्कारप्रकरणी ७ वर्षे सक्तमजुरी व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

याप्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने ॲड शितल डोके यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड विक्रांत फताटे यांनी काम पाहिले.

---

### नियोजन मधून जलसंधारण व मूलभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य

# जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ : प्रशासकीय मान्यतेस ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत कामांना / योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या मुदतीत शासन मान्यतेने दि. ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत वाढ करण्यात आली आहे.

नियोजन विभागाच्या दि. १ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता माहे जून अखेरपर्यंत देण्याची तरतूद आहे. नियोजन विभागाच्या दि. ३० जुलै, २०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यात मे २०२६ ते जून २०२६ या कालावधीत विधान परिषदेच्या (स्थानिक स्वराज्य संस्था) आदर्श आचारसंहितेमुळे परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न होणे, जिल्हा नियोजन समितीची सभा आयोजित करणे शक्य न होणे व तांत्रिक मान्यता विहित वेळेत प्राप्त न होणे या कारणास्तव ही मुदत प्रथम एकवेळची विशेष बाब म्हणून सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली होती. आता एल-निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती तसेच पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागात पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असल्याच्या पार्श्वभूमीवर नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार ही मुदत ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

या वाढीव मुदतीत केवळ प्राधान्याने करावयाच्या १३ प्रकारच्या कामांनाच प्रशासकीय मान्यता देता येणार असून यामध्ये - १) जलसंधारण, नाला खोलीकरण, २) मृदसंधारण, ३) जलयुक्त शिवार, ४) शिवकालीन बंधारे, ५) पाणीपुरवठा योजनांनजीक रिचार्ज शाफ्ट / जलस्रोत बळकटीकरण, ६) कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना फळ्या टाकणे, ७) बंधाऱ्यांचे बळकटीकरण, ८) शासकीय, जिल्हा, उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांतील मूलभूत सुविधांची देखभाल-दुरुस्ती (नवीन बांधकामे वगळून), ९) शासकीय निवासी शाळा, आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, आयटीआय, महाविद्यालयांतील देखभाल-दुरुस्ती, १०) वैरण विकास, ११) कृषी व संलग्न कामे, १२) ग्राम विद्युतीकरण व सौर ऊर्जेवर आधारित विद्युतीकरण, १३) स्मशानभूमी दुरुस्ती यांचा समावेश आहे.

या पार्श्वभूमीवर ज्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिमेंटचा वापर होतो अशी गटारे व इतर तत्सम कामे या वाढीव कालावधीत घेता येणार नाहीत. प्रामुख्याने काँक्रीट रस्ते, सांडपाणी, निचरा योजनांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही स्वतंत्र परिपत्रकांनुसार करावी. तसेच पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागांमध्ये पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे व आचारसंहितेच्या कोणत्याही तरतुदीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत प्रशासकीय मान्यता देताना वरील सर्व नियमांचे पालन करून दि. ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत मान्यता पूर्ण करावी. या प्रकरणी दिरंगाई झाल्यास याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभाग प्रमुखावर निश्चित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती एस. कार्तीकेयन यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.